# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

क्र.म.वि./ 4919 दिनांक:—१४.०७.२०१४

प्रति,

प्राचार्य,
गुरुनानक इन्स्टिटयुट ऑफ इंजीनियरिंग ॲण्ड टेक्नालॉजी,
कळमेश्वर रोड, नागपूर.

विषय :—सत्र २०१४—१५ पासुन नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना प्रथम संलग्निकरण प्रदान करण्याबाबत.

संदर्भ :— शासन पत्र क्र. शासन निर्णय क्र.टीईएम/२०१४/प्र.क्र.१५१(ब)/तांशि—४, दिनांक ३ जुलै, २०१४.

महोदय,

मा.कुलगुरुंच्या आदेशानुसार आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भांकित पत्रानूसार राज्य शासनाने आपल्या संस्थेला सत्र २०१४—१५ पासुन नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडया सुरु करण्यास दिलेल्या परवानगीनुसार मा. कुलगुरुंनी विव्दत परिषदेच्या वतीने म.वि. अधिनियम १९९४ च्या कलम १४ (७) अंतर्गत नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना सत्र २०१४—१५ पासून स्थानिय चौकशी समितीच्या शिफारशीच्या अधीन राहून विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन राहून प्रदान केले आहे.

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडया | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १. | गुरुनानक इन्स्टिटयुट ऑफ इंजीनियरिंग ॲण्ड टेक्नालॉजी, कळमेश्वर रोड, नागपूर. | १. एम टेक — पॉवर इले. ॲण्ड पॉवर सिस्टम्स<br>२. एम टेक — कम्प्यु. सायंस ॲण्ड इंजीनियरिंग<br>३. बी. ई.— इले.ॲण्ड टेली कम्प्यूनिकेशन इंजी.<br>४. बी.ई.— इलेक्ट्रीकल इंजीनियरिंग | २४ विद्यार्थी<br>२४ विद्यार्थी<br>६० वरुन १२०<br>६० वरुन १२० |

**प्रथम संलग्निकरण खालील अटींच्या अधिन प्रदान करण्यात येत आहे**

१. उपरोक्त नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना देण्यात आलेले प्रथम संलग्निकरण विद्यापीठाद्वारे गठीत करण्यात येणा—या स्थानिय चौकशी समितीच्या शिफारशीच्या अधिनस्थ प्रदान करण्यात आले आहे.
२. संदर्भांकित शासन परवानगीमध्ये नमूद केलेले संपूर्ण अटीचे पालन संस्थेने/महाविद्यालयाने विहीत कालावधीमध्ये पूर्ण करण्याच्या अटीवर संलग्नीकरण देण्यात येत आहे.
३. विद्यापीठाने विहीत केलेल्या निकषानुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहीत केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार महाविद्यालयांनी अध्यापक वर्ग/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असुन इतर सर्व आवश्यक पायाभुत सोयी उपलब्ध करुन त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करुन विद्यापीठास तसे प्रमाणपत्र देण्याच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.
४. उपरोक्त अभ्यासक्रमाची परवानगी प्राचार्य व नियमित शिक्षक भरण्याच्या अटीवर देण्यात येत आहे. प्राचार्य व नियमित शिक्षकांची नियुक्ती न केल्यास विद्यार्थ्यांना दिलेले प्रवेश रद्द होतील.
५. उपरोक्त नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडया कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास आपले महाविद्यालय तयार असून त्या आशयाचे हमीपत्र महाविद्यालयाने विभागीय सहसंचालक (तंत्र शिक्षण) नागपूर यांना सादर करण्याचे अटीवर ही मान्यता देण्यात येत आहे.
६. प्रथम संलग्निकरण प्राप्त झाल्यानंतर ज्या महाविद्यालयांनी वरील नमुद विविध अटी व शर्तीची पुर्तता केली नाही अशा महाविद्यालयांना पुढील निरंतर संलग्निकरण देता येणार नाही व जर अशा महाविद्यालयानी पुढील सत्रासाठी प्रवेश प्रक्रिया केली तर प्रवेशित विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठ घेणार नाही व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची राहील.
७. ज्या अभ्यासक्रमाचे अभ्यासक्रमीका, अध्यादेश विद्यापीठात तयार नाही असे अभ्यासक्रम/ विषय महाविद्यालयांनी सुरु करु नये.
८. कायम विना अनुदान तत्वावर संस्थेस/महाविद्यालय नवीन विद्याशाखा/अभ्यासक्रम/विषय/अतिरीक्त तुकडयांना आर्थिकदृष्टया चालविणे शक्य व्हावे यासाठी संस्थेने/महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून विद्यापीठ/शिक्षण शुल्क समितीने ठरविलेल्या शुल्कानुसारच शुल्क आकारावे.
९. महाविद्यालयाच्या बांधकामाचे मोजमाप करण्याकरीता अभियंता समिती महाविद्यालयाला भेट देऊन सादर केलेल्या अहवालातील अटीच्या अधिन मान्यता देण्यात येत आहे.
१०. वरील सर्व अटींची पुर्तता तसेच पुढील निरंतर संलग्निकरणाकरीता अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद/ राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/ बार कौन्सिल ऑफ इंडिया इत्यादी शिखर संस्थांनी घालुन दिलेल्या अटींची पुर्तता विहीत कालावधीत संस्थेने न केल्यास पुढील संलग्निकरण स्थगित होईल व त्याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालयाची/ संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.
११. रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट १९९९ याची कठोरपणे अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.
१२. महाविद्यालयातील सदर अभ्यासक्रमाचे पूढील वर्षासाठी निरंतर संलग्नीकरणाकरीता शुल्कासह आवेदनपत्र दि. ३१ ऑगष्ट पूर्वी विद्यापीठात सादर करावे.

कृपया कळावे.

आपला

(श्री सो भारंबे)
उपकुलसचिव (म.वि.)

प्रतिलिपी माहितीकरिता सादर:–

१. मा.संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे.
२. मा.सहसंचालक, (तंत्र शिक्षण), नागपूर विभाग,नागपूर
३. मा.संचालक (म.वि.वि.म.)
४. मा.वित्त व लेखा अधिकारी
५. मा.परिक्षा नियंत्रक,
६. उपकुलसचिव विद्या विभाग
७. सहायक कुलसचिव, परिक्षा विभाग,गोपनिय विभाग,व्यावसायिक परीक्षा,परीक्षा व चौकशी
८. संबंधित लिपीक, शिक्षक मान्यता
९. संबंधित लिपीक, संलग्निकरण शाखा

(३ ते ९) रा.तु.म.नागपूर विद्यापीठ,नागपूर.

यांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी आपल्या स्तरावर आवश्यक ती कार्यवाही करावी.

(रमण मदने)
सहायक कुलसचिव (म.वि.)

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन, शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगष्ट, १९२३ व्दारा स्थापित, व
महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ व्दारा संचालित राज्य विद्यापीठ )

## महाविद्यालयीन शाखा

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविंद्रनाथ टागोर मार्ग, नागपुर–४४० ००१, दुरध्वनी क्रमांक: ०७१२–२५२९९३२
फॅक्स नं. ०७१२–२५५५७०१, Email ID : ar-cs@nagpuruniversity.org


क्र.म.वि. 438.

दिनांक:– 30/5./२०१४

# प्रमाण—पत्र

प्रमाणित करण्यात येते की **गुरूनानक इंस्टिटयुट ऑफ इंजिनीअरिंग ॲन्ड टेक्नोलॉजी, दहेगांव, ता.कळमेश्वर, जि. नागपूर** या महाविद्यालयात सुरू असलेले **बी.ई.** :– कॉम्पुटर सायंस ॲड इंजिनिअरिंग, इन्फॉरमेशन टेक्नोलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग, इलेक्ट्रॉनिक्स ॲण्ड टेली–कॉम्युनिकेशन, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग, व **एम.बी.ए.** अभ्यासक्रम हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यीपीठाशी **सत्र २०१४–१५** करीता **तात्पुरते संलग्नित** असुन संलग्निकरणाची पुढील प्रक्रिया सुरु आहे.

सदर **प्रमाण—पत्र** महाविद्यालयास विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनेअंतर्गत मिळावयाचे अनुदान आणि विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या प्रवास सवलती, शिष्यवृत्ती व इतर आर्थिक सवलती मिळण्याच्या दृष्टीने प्रदान करण्यात येत आहे.

सहायक कुलसचिव(म.वि.)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,
नागपूर विद्यापीठ, नागपूर.